


नागपूर शहर पोलीस आणि सायबर कॅफे असोसिएशनच्या कार्यक्रमात बोलताना पोलीस आयुक्त प्रवीण दीक्षित. शेजारी अभिजित देसाई.

# दहशतवाद्यांची माहिती मिळवण्यासाठी नवे सॉफ्टवेअर -प्रवीण दीक्षित

**नागपूर, ८ जानेवारी / प्रतिनिधी**

माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात कितीही प्रगती झाली तरी, देशाला सर्वात मोठा धोका दहशतवाद्यांकडून आहे. इंटनेटनेटच्या माध्यमातून ते देशभरात विध्वंसक कृत्ये घडवून आणतात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक सायबर कॅफेमध्ये अशा लोकांची माहिती मिळविण्यासाठी आयडेक्टेस इनोव्हेशनने तयार केलेल्या नव्या सॉफ्टवेअरचा उपयोग करावा असे आवाहन पोलीस आयुक्त प्रवीण दीक्षित यांनी केले.

नागपूर शहर पोलीस आणि सायबर कॅफे संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक सहकारी बँकेच्या सभागृहात शहरातील सायबर कॅफे संचालकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. बहुतांश सायबर कॅफेमध्ये मेल पाठविणाऱ्यांची नोंदवहीत माहिती लिहिली जाते पण, त्या माहितीवरून संबंधित व्यक्तीची ओळख पटविणे कठीण होत असल्याचे दिसून आले आहे. शहरातील काही सायबर कॅफेमध्ये तर ओळखपत्राची मागणी सुद्धा करण्यात येत नाही. भारतामध्ये सायबर कॅफेचा वापर समाजविरोधी घटक मोठ्या प्रमाणात करीत आहेत. सायबर कॅफेला सोप्या पद्धतीने व सुरक्षित व्यवसाय करणे शक्य व्हावे तसेच राष्ट्रीय सुरक्षेत मदत करता यावी यासाठी क्लिक सायबर कॅफे मॅनेजर हे नवीन सॉफ्टवेअर आयडेक्ट्स इनोव्हेशन या कंपनीने बाजारात आणले आहे. शहरात सायबर कॅफेची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे सावधगिरी म्हणून या नवीन सॉफ्टवेअरचा उपयोग प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. त्यामुळे पोलिसांना एखाद्या घटनेचा शोध घेण्यासाठी सोयीचे होईल. गेल्या काही वर्षात इंटनेटचा फायदा घेण्यापेक्षा गैरफायदा घेतला जात आहे. घातपात घडविण्यासाठी दहशतवादी याचा उपयोग करीत असल्यामुळे सायबर कॅफेमध्ये सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे, असे प्रवीण दीक्षित म्हणाले.

यावेळी आयडेक्ट्स इनोव्हेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित देसाई यांनी क्लिक सायबर कॅफे मॅनेजर या नवीन सॉफ्टवेअरची माहिती दिली. या सॉफ्टवेअरमुळे काय फायदे होऊ शकतात त्यासंबंधी अनेक उदाहरणे दिली. इंटरनेटचा उपयोग करून भारतातील ४७ टक्के ॲक्सेस पॉईंट्स सायबर कॅफे वापरत असल्याने सायबर गुन्ह्याकरिता ती हॉट स्पॉटस म्हणून उदयाला आली आहे आणि त्यामुळे सुरक्षा महत्त्वपूर्ण आहे. सायबर कॅफेला भेट देणाऱ्यांची माहिती साठवून ठेवण्यासाठी आजही अनेक कॅफेकडे ठोस उपाययोजना नाही. क्लिक सायबर कॅफे मॅनेजरच्या मदतीने आयडेक्टसने आपल्या भागीदारांना सरळसोपे सॉफ्टवेअर पुरविले असून जेणे करुन कॅफेला भेट देणाऱ्यांची माहिती दीर्घकाळ जपून ठेवता येईल. देशभरातील सायबर कॅफेचे मालक ही सेवा निःशुल्क घेऊ शकतील, असेही देसाई यांनी सांगितले. यावेळी पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ■